# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**पनवेल येथे स्वस्तात घरे देण्याच्या नावाखाली ग्राहकांची फसवणुक केली जात असल्याबाबत**

**(१) ६५०१६ (१०-११-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल येथे स्वस्तात घर देतो म्हणून बोगस बांधकाम व्यावसायिकांनी दलाल नेमून मुंबईतील हजारो ग्राहकांकडून बुकिंगसाठी रुपये ५० हजार ते ३ लाखांपर्यत रक्कम घेवून त्यांची फसवणूक केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार बोगस बांधकाम व्यावसायिक व दलालांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात बोगस बांधकाम व्यावसायिक व दलालांविरुध्द तक्रार प्राप्त झाल्यानंतर त्यांचेवर एकूण ३२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत त्यापैकी ७ गुन्हे न्यायप्रविष्ठ व २५ गुन्हे तपासावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुलुंड (मुंबई) येथील जकात नाक्याजवळ अल्पवयीन मुलीवर**
**अत्याचार करुन हत्या करण्यात आल्याबाबत**

**(२) ६५२४९ (१७-०१-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड (मुंबई) येथील द्रुतगती मार्गाशेजारी जकात नाक्याजवळ एका झोपडीत राहणाऱ्या ११ वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन तिची हत्या केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी नवघर पोलिस ठाण्यात तकार नोंदविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :**(१) होय.
(२) होय.
(३) सदर प्रकरणी नवघर पोलीस ठाणेत गुन्हा नोंद क्र.१९४/१६ कलम ३०२, ३७६(२)(आय)(जे), ३७७ भा.दं.वि. सह पोक्सो अधिनियम २०१२ चे कलम ४, ६, ८, १० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आले असून, आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दि.१९.१२.२०१६ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कांदिवली (मुंबई) येथे महिलेवर सामुहिक बलात्कार करण्यात आल्याबाबत

**(३) ६५२५३ (१७-०१-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कांदिवली (मुंबई) येथे नैसर्गिक विधीसाठी गेलेल्या ३५ वर्षीय महिलेचा पाठलाग करुन, तिच्यावर सामुहिक बलात्कार केल्याची घटना माहे सप्टेबर, २०१६ मध्ये घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार आरोपींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
फिर्यादी महिला नैसर्गिक विधीकरिता गेलेली नसून तिचे नातेवाईकाचे घर बंद असल्याने आशीष हॉटेल बाहेरील मोकळ्या जागेतील स्टॉलच्या मागे फुटपाथवर न्यु लिंक रोड, एकता नगर, कांदिवली (प.) मुंबई येथे आडोशाला बसली होती. तेथे तिच्यावर अनोळखी इसमांकडून इच्छेविरुध्द बलात्कार करण्यात आले.
(२) सदर घटनेबाबत कांदिवली पोलीस ठाणे येथे गुरक्र.३४३/२०१६ कलम ३७६, ५०९, ३२३, ५०६, ३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हयातील दोन आरोपींना अटक करण्यात आले असून, आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊनही असंख्य उमदेवार बेरोजगार असल्याबाबत**

**(४) ६५४४८ (१०-०१-२०१७). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षेत असंख्य तरुण उत्तीर्ण होऊनही गत दोन वर्षे शासनाच्या नोकरीपासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नोकर भरतीवरील कपात त्वरित उठवावी, पीएसआय पदाची जाहिरात त्वरित काढावी, राज्यसेवेच्या रिक्त जागा भराव्यात, कंत्राटी पद्धतीने नव्हे तर स्पर्धा परीक्षांतून जागा भरल्या जाव्यात, प्रतीक्षा यादी लावण्यात यावी, कृषि सेवक परीक्षेच्या गैरव्यवहाराची चौकशी करावी आदी मागण्या प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाने तंत्रशिक्षण महाविद्यालयातील कंत्राटी अभिव्याख्यात्याना सेवेत सामावून घेण्याचे आदेश दिले असतांनाही लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत निवड झालेल्या उमेदवारांना नोकरीत घेण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने जागा रिक्त्त नसल्याचे कारण देत सदर उमेदवारांना घेण्यास नकार दिल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झालेल्या असंख्य उमेदवारांना शासनाच्या सेवेत सामावून घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०१७) :**(१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) शासन सेवेतील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्यास निर्बंध आणण्यात आले असले तरीही काही अत्यावश्यक संवर्गातील पदे या निर्बंधातून वगळण्यात आली आहेत. या संवर्गाव्यतिरिक्त अन्य संवर्गातील सरळसेवा कोट्यातील रिक्त पदे विहीत मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात भरण्याची विभागाची आवश्यकता असल्यास प्रधान सचिव (सेवा) साप्रवि यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या मान्यतेने विभागास पदे भरण्याची कार्यवाही करता येते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने पोलीस उपनिरीक्षक तसेच राज्य सेवेतील पदांसाठी अनुक्रमे ७.१२.२०१६ व १४.१२.२०१६ रोजी जाहीरात प्रसिध्द केली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत एकाच संवर्गातील पदांसाठी घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षांद्वारे केलेल्या भरतीमध्ये किंवा थेट मुलाखतीद्वारे केलेल्या भरती प्रक्रियेमध्ये आयोगाकडून प्रतिक्षा यादी ठेवली जाते. मात्र एकापेक्षा अधिक संवर्गाची पदे भरण्यात येत असल्यास अशा वेळी प्रतिक्षा यादी ठवेणे शक्य नसल्यामुळे ती ठेवली जात नाही.

कृषि सेवक भरती प्रक्रीयेत अक्षम्य चुका झाल्याचे निदर्शनास आल्याने कृषि सेवक परीक्षा व जाहीर केलेली निवड यादी रद्द करुन महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषदेस कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३), (४), (५) व (६) शासकीय तंत्रनिकेतन व तत्सम संस्था आणि शासकीय अभियांत्रिकी व औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयातील ६६ कार्यरत कंत्राटी / हंगामी अध्यापकांच्या सेवा ह्या मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन नियमित केल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने ८७ उमेदवारांच्या शिफारशी केल्या असल्या तरी २२ उमेदवारांना प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार नियुक्त्या दिल्या आहेत.

---

**सोलापूर व अन्य ९ विमानतळाच्या विकासासाठीचा केलेल्या सामंजस्य कराराबाबत**

**(५) ६५५२६ (१०-०१-२०१७). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर, शिर्डी, अमरावती, गोंदिया, नाशिक, जळगाव, नांदेड, कोल्हापूर, रत्नागिरी आणि सिंधूदुर्ग येथील विमानतळाच्या विकासासाठी भारतीय विमानतळ विकास प्राधिकरण व केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्रालय यांचेबरोबर शासनाने सामंजस्य करार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील ठिकाणच्या विमानतळाच्या विकासासाठी शासनाने कोणत्या सुविधा पुरविण्याची जबाबदारी घेतली आहे तसेच त्यासाठी अंदाजे किती खर्च येईल अशी अपेक्षा आहे,

(३) तसेच सोलापूर विमानतळावरून प्रत्यक्ष विमानाची वाहतूक केंव्हापर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०३-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) राज्यातील सोलापूर व अन्य ९ ठिकाणी विमानतळांचा विकास करणे याबाबतची कार्यवाही केंद्र शासनाच्या “Regional Connectivity Scheme” या योजनेंतर्गत केंद्र शासन स्तरावरुन सुरु आहे. तरी, विमानतळ विकासासाठी पुरवावयाच्या सुविधांबाबत केंद्र शासन स्तरावरुन निर्णय घेण्यात आल्यावर त्याअनुषंगाने राज्य शासनामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**खजनी-हाळ (जि.रायगड) येथील कुटुंबीयाना वाळीत टाकण्यात आल्याबाबत**

**(६) ६५७८९ (१७-०१-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खजनी-हाळ रोहा (जि.रायगड) भालगाव भागात जातीय भावनेतून वाळीत टाकल्या प्रकरणाची तक्रार पिडीत कुटुंबीयाकडून दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ वा त्या सुमारास मा.गृह मंत्री, मा.सामाजिक न्याय मंत्री, मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे तसेच संबंधित यंत्रणेकडे सविस्तर लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :**(१) फिर्यादीने दि.२४.१०.२०१३ व दि.१४.९.२०१६ रोजी पोलीस विभागास तक्रारी दिलेल्या आहेत.

(२) सन २०१३ मध्ये खाजनी ता.रोहा येथील वाळीत प्रकरणी गु.र.नं. १२२/२०१३ भादंवि कलम १५३(अ), १५३(ब), १२०(ब), ११७ अन्वये गुन्हा दाखल आहे. गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आले असून, आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

सन २०१६ मध्ये हाळ, ता.रोहा येथील वाळीत प्रकरणी गु.र.नं. १९१/२०१६ भादंवि कलम १५३(अ), १२०(ब), ११७, ५०७ ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. गुन्ह्यातील ८ आरोपींना अटक करण्यात आले आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उस्मानाबाद शहरातील शाहूनगर भागात पोलीस उपनिरीक्षकाने अल्पवयीन मुलीवर केलेला बलात्कार

**(७) ६५९३० (१६-०१-२०१७). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद शहरातील शाहूनगर भागात प्रेमकुमार सुखदेव बनसोडे या पोलीस उपनिरीक्षकाने दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :**(१) होय.

(२) आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन आनंदनगर, उस्मानाबाद गुरनं. १०१/२०१६ कलम ३७६, ३७६(I)(A), ३७६(२)(I), ३७६ (२)(N), ३७६(२)(K), ३५४, ३५४A (II)(III), ५०६ भादंवि सह कलम बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक अधिनियम २०१२ कलम ३(a), ४, ५(४), ६, ८, १०, ११(३), १२ सह कलम ६७B(b) माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले आहे. गुन्ह्याचा तपास पुर्ण करुन आरोपीविरुध्द दि. २१.१०.२०१६ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वरुर बुद्रुक (ता.शेवगांव, जि.अहमदनगर) येथील दलित समाजावर सामुहिक बहिष्कार टाकण्यात आल्याबाबत**

**(८) ६६२५५ (१६-०१-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरुर बुद्रुक (ता.शेवगांव, जि.अहमदनगर) येथे आंबेडकर चौथऱ्यावर झेंडा उभारल्यामुळे लोकांनी दलित समाजावर सामुहिक बहिष्कार टाकला असल्याने परिसरातील हजारो नागरीकांनी दिनांक १९ ऑगष्ट, २०१६ रोजी शेवगावच्या तहसील कार्यालयावर मोर्चा काढून आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने दलित समाजाला संरक्षण देण्यासंदर्भात तसेच उक्त प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :**(१) नाही.

(२) चौकशीमध्ये वरुर गावात दि. १४.४.२०१६ रोजी आंबेडकर जंयतीवेळी ग्रामपंचायतीच्या मालकीचे मोकळ्या पटांगणामध्ये मारुती मंदिरासमोर निळा झेंडा लावण्यात आला होता. सदर झेंडा लावण्यास कोणतीही अधिकृत परवानगी न घेता सरपंच यांचे सांगण्यावरुन लावण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर त्याच मैदानामध्ये काही दिवसांनी भगवा, पिवळ व हिरवा झेंडा लावण्यात आले होते. याबबत ग्रामपंचायतने तहसिलदार व पंचायत समिती यांना कळविले होते. अनधिकृत झेंडे काढण्याबाबत गावात शांतता कमिटीची मिटींग घेण्यात आली होती. परंतु ग्रामस्थांची सर्व संमती न झाल्यामुळे सदरची मिटींग कोणत्याही ठोस निर्णयाशिवाय तहकुब करण्यात आली होती. त्यानंतर सदर मारुती मंदिरासमोरील अनाधिकृत झेड्यांचे अतिक्रमण पोलीस बंदोबस्तात शांततेने ग्रामपंचायतीमार्फत काढण्यात आलेले आहे.

दि. १५.८.२०१६ रोजी दोन दलित समाजातील मुलांनी मराठा समाजातील मुलीची छेड काढल्याप्रकरणी शेवगाव पोलीस स्टेशन येथे विनयभंगाचा गुन्हा दाखल असल्याने त्या निषेधार्थ दि. १६.८.२०१६ रोजी वरुन ग्रामस्थांनी १२.०० वाजेपर्यंत गाव बंद ठेवलेले होते. परंतू गावामध्ये कोणत्याही प्रकारे घोषीत किंवा अघोषीत बहिष्कार टाकण्यात आलेला नव्हता.

दि. १५.८.२०१६ पासून वरुन गावामध्ये काही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये व दलित सवर्ण असा वाद होऊ नये म्हणून मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त नेमण्यात आलेला होता.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे टाहाकरी (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील अल्पवयीन मुलीस पळवून नेऊन अत्याचार करण्यात आल्याबाबत**

**(९) ६६४४१ (१७-०१-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे टाहाकरी (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील अल्पवयीन मुलीस पळवून नेऊन अत्याचार केल्याची घटना माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०१७) :**(१) होय.

(२) फिर्यादीची अल्पवयीन पिडीत मुलगी हिस दि.१०.९.२०१६ रोजी आरोपी क्र.१ ने पळवून नेऊन हरमनी इंटरनॅशनल स्कुल, वडगांव गुप्ता, अहमदनगर येथे स्टाफरुममध्ये डांबून ठेवले तसेच दि.११.९.२०१६ रोजी बलात्कार केला तसेच आरोपी क्र.२ ने विनयभंग केला असे दिलेल्या फिर्यादीवरुन अकोले पोलीस स्टेशन गुरनं.। १२२/२०१६ भादंवि कलम ३६३, ३७६(२)(आय), ३४३, ३५४, ३४ बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा २०१२ चे कलम ४, ५ (एल), ६ प्रमाणे दि.२०.९.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना अटक करण्यात आले असून, आरोपीविरुध्द दि.१५.१२.२०१६ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या सेवेत आदिवासींच्या जागेवर कार्यरत असणाऱ्या बिगर आदिवासींना संरक्षण देण्याचा शासनाने घेतलेल्या निर्णयाबाबत**

**(१०) ६६५४७ (१०-०१-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सेवेत बनावट दाखले देऊन आदिवासींच्या जागेवर शासकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या बिगर आदिवासींना संरक्षण देण्याचा निर्णय शासनाने माहे ऑक्टोबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यभरातील आदिवासी लोकप्रतिनिधींनी सदर निर्णयाला विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासीसाठी राखीव असलेल्या जागेबर बिगर आदिवासींची नियुक्ती करण्यात येऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०३-२०१७)** :(१) होय.

(२) होय.

(३) व (४) बाबत दि.१५.६.१९९५ नंतर दि.१७.१०.२००१ पर्यंत, या कालावधीत अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासन सेवेत नियुक्त झालेल्या ज्या कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे किंवा ज्या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र अद्यापपर्यंत सादर केलेले नाही, त्यांच्या सेवेस संरक्षण देण्याबाबत दि.४.३.२०११ च्या शासन निर्णयान्वये तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिगट गठित करण्यंत आले होते. सदर मंत्री गटाच्या अहवाल प्राप्त झाल्यानंतर मंत्रीगटाच्या शिफारशीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. यास्तव तत्कालीन महसूल मंत्री, यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या मंत्रीगटाने सादर केलेल्या अहवालासंदर्भात शासनाचा पुढील निर्णय होईपर्यंत अशा कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्यात येऊ नये अथवा त्यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात येऊ नये, असा निर्णय शासन परिपत्रक दि.२१.१०.२०१५ अन्वये देण्यात आला आहे. परंतु दि.२१.१०.२०१५ पूर्वीच अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्याने ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासन सेवेतून सेवामुक्त करण्यात आले आहे. अशा कर्मचाऱ्यांना शासन सेवेत पुर्नस्थापित करण्याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

तसेच शासन परिपत्रक दि.२१.१०.२०१५ च्या परिपत्रकाविरुध्द मा.उच्च न्यायालय मुंबई, नागपूर खंडपीठ येथे रिट याचिका क्र.६२४७/२०१५ दाखल केली आहे. या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी दिनांक २५.४.२०१६ च्या आदेशान्वये शासनाच्या दिनांक २१.१०.२०१५ च्या परिपत्रकास स्थगिती दिलेली आहे.

---

## पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीची गुन्हे अन्वेषण विभागाकडून सुरु असलेली चौकशी पूर्ण करण्याबाबत

**(११) ६६६६५ (१०-०१-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीची गुन्हे अन्वेषण विभागाकडून सुरु असलेल्या चौकशीचे काम पूर्ण झाले आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०१७)** :(१) राज्य गुन्हे अन्वेषण विभाग परिक्षेत्र कोल्हापूर यांच्यामार्फत दि.२२.५.२०१५ पासून अद्याप चौकशी सुरु आहे.

(२) अद्याप चौकशी सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत अल्पवयीन मुलींवरील अत्याचारात झालेली वाढ

**(१२) ६६९१२ (११-०१-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विक्रोळी पार्क साईट (मुंबई) येथे दोन वर्षीय अल्पवयीन मुलीवर त्याच भागातील २५ वर्षीय व्यक्तीने अत्याचार केल्याचे दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मानखुर्द, पवई, शिवाजीनगर, विक्रोळी सह मुंबई शहरात जानेवारी ते ऑगस्ट, २०१६ अखेर मुलींवर अत्याचाराच्या अनेक घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा घटनांना पायबंद घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :**(१) होय.
(२) जानेवारी ते ऑगस्ट २०१६ या कालावधीत बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील मुलींवरील बलात्काराचे एकूण २९४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यापैकी मानखुर्द पोलीस ठाणे येथे ५ गुन्हे, पवई पोलीस ठाणे येथे ६ गुन्हे, शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे १३ गुन्हे व विक्रोळी पोलीस ठाणे येथे ६ गुन्हे दाखल आहेत.
(३) दि. १२.८.२०१६ रोजी विक्रोळी पार्क साईट येथे अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणी पार्कसाईट पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र. २८७/१६, कलम ३६३, ३७६(२)(आय) भादवि सह कलम ४, ८, १०, १२ पोक्सो कायदा २०१२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मुलींवरील व महिलांवरील अत्याचाराबाबतच्या घटनांना पायबंद घालण्याच्या दृष्टीने विविध पोलीस ठाणेच्या हद्दीत गुप्त बातमीदारांकडून माहिती घेतली जाते व अशी गुन्हे घडणार नाही याची दक्षता घेतली जाते.

- पोलीस दीदी योजनेमार्फत मार्गदर्शन करतात, शाळांमध्ये विद्यार्थ्यांना बॅड टच व गुड टच याबाबत मार्गदर्शन केले जाते.

- शाळा सुटल्यावर अनोळखी व्यक्तीसोबत मुलांना न पाठविणेबाबत सूचना देण्यात येतात.

- मोहल्ला कमिटीचे बैठक आयोजित करुन मुलांना बाहेर एकटे सोडू नये, त्यांच्यावर लक्ष ठेवावे, कोणती अनोळखी इसम मुलांबरोबर बोलत असल्यास संशयित वाटल्यास त्याची खबर पोलीसांनी द्यावी, मुलांनी अनोळखी इसमांकडून खेळणी, चॉकलेट घेण्यास मनाई करावी अशी सूचना देण्यात येतात,

- दिवसा व रात्री बिनतारी वाहन, बिट अधिकारी व अंमलदार यांचेमार्फतीने गस्तीचे आयोजन करण्यात येते,

- मुली व महिलांवर होत असलेल्या अत्याचाराबाबत प्रतिबंध होण्यासाठी योग्य ती खबरदारी घेण्याबाबत पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी विविध उपक्रम राबविले असून, याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना नियमित सूचना देण्यात येते.

- प्रत्येक पोलीस ठाण्यात महिला कक्षाची स्थापना, महिला दक्षता कमिटीची स्थापना, महिला छेडछाड विरोधी पथक तयार करण्यात आले आहे,

- महिला पोलीस अधिकारी व अंमलदाराची नियुती करण्यात आले आहे,

- महिलांच्या संरक्षणासंदर्भात जागरुकता वाढविण्याकरिता कार्यशाळा, चर्चासत्र व विशेष मोहिमा राबविण्यात येतात,

- नवीन हेल्पलाईन क्र. ९९६९७७७८८८ सुरु करण्यात आली आहे, महिलांनी ज्या रिक्षा अथवा टॅक्सीमधून प्रवास करीत आहे त्या रिक्षा अथवा टॅक्सीचा क्रमांक हेल्पलाईनवर पाठविल्यास पोलीसांच्या डेटाबेसमध्ये नोंद करण्यात येते व जीपीएसच्या माध्यमातून मोबाईल क्रमांकाचा माग काढता येतो,

- बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाअंतर्गत एकूण १०२ महिला बिट मार्शल (चार्ली मार्शल) नेमण्यात आले आहेत, ९४ महिला व बालसुरक्षा गस्त पथके तयार करण्यात आली आहेत,

- महिला व महिलांच्या मदतीकरिता विशेष हेल्पलाईन १००, १०३ व १०९२ सुरु करण्यात आली आहे,

- मुंबई शहरातील निर्मनुष्य जागांचे सुरक्षा ऑडीट करण्यात आले असून, सीसीटीव्ही कॅमेरे, प्रकाश व्यवस्था करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष यांच्या गैरकारभाराबाबत**

**(१३) ६७०३६ (१०-०१-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष तसेच आयोगाचे परिक्षा नियंत्रक व सहसचिव यांच्या गैरकारभाराविरुध्द आयोगाचे माजी सदस्य तसेच लोकप्रतिनिधींमार्फत मा.राज्यपाल तसेच मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये तक्रार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय नोक-यांसाठी निवड प्रक्रिया राबविणाऱ्या आयोगात अध्यक्ष व सदस्य यांच्यामध्ये वाद निर्माण झाले असून आयोगाचे परिक्षा नियंत्रक व सह सचिव यांचेकडे गोपनीय विभागातील पत्रिका व मुद्रित शोधनाचे काम सोपविण्यात आल्याने आयोगातील गोपनियतेचा भंग झाल्यामुळे परिक्षा विभागा धोक्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आयोगातील गैरप्रकारांना आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे. आयोगाचे माजी सदस्य व लोकप्रतिनिधी यांनी मा.राज्यपाल यांच्याकडे अनुक्रमे दिनांक २५.७.२०१६ व दिनांक २३.०८.२०१६ रोजी तक्रारी केल्या आहेत.
(२), (३) व (४) गोपनीयतेचा भंग होऊन परीक्षा विभाग धोक्यात आला आहे अशी कोणतीही बाब महाराष्ट्र लोकसेवा आयोगात आढळून आली नाही.

---

**कुऱ्हा (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती मिळाली नसल्याने गळफास लावून केलेली आत्महत्या**

**(१४) ६७४०६ (११-०१-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुऱ्हा (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील संजय मधुकर तायडे या विद्यार्थ्याला गत ३ वर्षापासून शिष्यवृत्ती मिळाली नसल्याने त्याने गळफास लावून आत्महत्या केली असून दामणगांव पोलिसांनी अद्यापही गुन्हा दाखल करुन दोषींवर कारवाई केली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०१७)** :(१) व (२) सदर प्रकरणी धामणगांव बढे येथे अप क्र. १४६/२०१६ भादवि कलम ३०६, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणाच्या चौकशीत ३ आरोपी निष्पन्न झाले असून सर्व आरोपींनी मा.न्यायालयातून अटक पूर्व जामीन प्राप्त केला आहे. सदर प्रकरणी मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खरशेत (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील रयत शिक्षण संस्थेच्या आश्रमशाळेतील अल्पवयीन विद्यार्थीनी अत्याचार केल्याबाबत**

**(१५) ६७४२३ (११-०१-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खरशेत (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील रयत शिक्षण संस्थेच्या आश्रमशाळेतील १२ वीच्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या अल्पवयीन विद्यार्थीनीवर सतत सहा महिने बलात्कार व लैंगिक अत्याचार केल्याची घटना माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात सहभागी असलेले मुख्याध्यापक, एक महिला कर्मचारी, गावातील अंगणवाडी सेविका व एक डॉक्टर यांची चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :**(१) व (२) सदर घटनाबाबत तक्रारी अर्ज प्राप्त झालेला होता. सदर तक्रारीबाबत मुलीची व आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांची सखोल चौकशी केली असता. चौकशीमध्ये काही एक तथ्य निष्पन्न झालेला नाही करिता कोणाविरुध्दही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील धर्मादाय रुग्णालयांमध्ये गरीब व निर्धन रुग्णावर मोफत व सवलतीच्या दरात उपचार करण्याबाबत**

**(१६) ६७४३६ (१०-०१-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई व ठाण्यातील धर्मादाय रुग्णालयांच्या ११३ रुग्णालयांपैकी तपासणी करण्यात आलेल्या ११ रुग्णालयांनी गरीब रुग्णाकडून नियमबाहयरित्या पैसे वसूल केल्याचे भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांनी कॅगच्या दिनांक ६ ऑगस्ट, २०१६ ला दिलेल्या अहवालात नमूद केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धर्मादाय रुग्णालयांच्या नावाखाली शासनाकडून नाममात्र दरात जमीन, जादा एफएसआय व कर सवलती मिळविणारी पुणे शहरातील रुबी हॉल क्लिनिक, जहॉगीर हॉस्पीटल, पुना हॉस्पीटल, दिनानाथ मंगेशकर हॉस्पीटल, सहयाद्री हॉस्पीटल इ. रुग्णालये गरीब व निर्धन रुग्णांना कुठल्याही सवलती देत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे शहरातील उपरोक्त हॉस्पीटलमध्ये गरीब व निर्धन रुग्णावर मोफत व सवलतीच्या दरात उपचार होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी विधान मंडळास सादर केलेल्या “सामान्य व सामाजिक क्षेत्र” अहवालात सदर बाब नमूद आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरुर (जि.पुणे) येथील न्यायालयाची नवीन इमारत बांधण्याबाबत

**(१७) ६७४६० (१०-०१-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर (जि.पुणे) येथील न्यायालय हे ब्रिटीशकालीन धोकादायक इमारतीमध्ये भरत असून सदर इमारत जीर्ण व मोडकळीस आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिरुर येथे नवीन इमारत बांधण्यासाठी न्यायालयाची स्वत:ची १० एकर जागा उपलब्ध आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिरुर येथील न्यायालयातील वकीलांनी शिरुर बार असोशिएशन तर्फे उच्च न्यायालय व शासनाकडे नवीन इमारत बांधण्याची माहे मार्च, २०१६ मध्ये मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिरुर येथील न्यायालयाची नवीन इमारती बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०१७) :**(१) शिरुर, जिल्हा पुणे येथील न्यायालयीन इमारत जीर्ण झालेली आहे. परंतु आजमितीस मोडकळीस आलेली नाही.

(२) शिरुर न्यायालयाकरीता विस्तीर्ण जागा मंजुर झालेली आहे.

(३) शिरुर. जि.पुणे येथे न्यायालयाची अद्यावत इमारत उभारण्याकरीता शिरुर बार असोशिएशन यांनी जिल्हा न्यायालय, पुणे या कार्यालयास प्रस्ताव दिला असून, सदरचा प्रस्ताव जिल्हा न्यायालयाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविला आहे.

(४) शिरुर, जि.पुणे येथे न्यायालयांची नवीन इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्यामार्फत अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.

(५) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्याबाबत

**(१८) ६७४८४ (१६-०१-२०१७). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत चोऱ्या, दरोडे, वाहतूक नियमांचे उल्लंघन आदी गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी सहा हजार सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सी.सी.टी.व्हीसाठी नियंत्रण कक्ष कोठे उभारण्यात येणार आहे व ही यंत्रणा प्रत्यक्षात कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबांची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७)** :(१) मुंबई शहरामध्ये एकूण ४७१७ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

(२) व (३) सर्व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे नियंत्रण पोलीस आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयात स्थापन केलेल्या नियंत्रण कक्षातून केले जाते. वाहतुक पोलीस मुख्यालय वरळी येथे अतिरिक्त नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. प्रकल्पाचा पहिला व दुसरा टप्पा कार्यान्वीत झाला असून तिसरा टप्पा लवकरच कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

---

## परभणी व हिंगोली जिल्हयातून दहशवाद विरोधी पथकाने इसिसशी संबंधीत व्यक्तींना अटक केल्याबाबत

**(१९) ६७६८४ (११-०१-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी व हिंगोली जिल्हयात घातपात घडविण्यासाठी स्फोटकांची जुळवाजुळव करणाऱ्या इसिसच्या एका एजंटला तसेच चार दहशतवादी व्यक्तींना दहशतवाद विरोधी पथकाने माहे जुलै-ऑगस्ट, २०१६ दरम्यान अटक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे अहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच राज्यातील दहशतवादी हिंसक कारवाया रोखण्यासाठी कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१७)** :(१) व (२) होय, हे खरे आहे.

नासेरबिन अबुबकर याफई (चाऊस), रा.परभणी या एजंटसह एकूण ४ व्यक्तींना दहशतवाद विरोधी पथकाने अटक केली आहे. त्यांच्याविरुध्द द.वि.प.पो.स्टे. काळाचौकी, मुंबई अप क्र. ०८/२०१६ रोजी भा.दं.वि. कलम १२० (ब) सह बेकायदेशीर हालचाली प्रतिबंधक कायदा १९६७ सुधारणा २००८ कलम १३, १६, १८, १८ (ब), २०, ३८, ३९ सह स्फोटक पदार्थ कायदा १९०८ कलम ४, ५, ६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात एकूण चार आरोपींना अटक करण्यात आली असून आरोपींविरुध्द कोर्ट केस क्र.१०६३/२०१६ अन्वये दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास राष्ट्रीय तपास यंत्रणा, मुंबई यांचेकडून करण्यात येत आहे.

(३) इसीस या दहशतवादी संघटनेस राज्यातील तरुण दाखल होऊ नयेत म्हणून खालील उपाययोजना करण्यात येत आहेत.

अ) दहशतवाद विरोधी पथकाच्या विविध पथकांची शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन विद्यार्थ्यांना दहशतवाद या विषयाबाबत जागृत करुन दहशतवादाबाबत पोलीसांना मदत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ब) युवकांना दहशतवादी संघटनेमध्ये सामील होण्यापासून परावृत्त करण्यात आले असून त्यांचे समुपदेशन करण्यात आले आहे.

क) राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील धर्मगुरु, मौलवी व विद्वान लोकांशी बैठक घेऊन इसीस या दहशतवादी संघटनेविरोधी अल्पसंख्यांक समाजामध्ये प्रबोधन करण्याची विनंती करण्यात आली आहे.

ड) धार्मिक अस्थिरता निर्माण करणाऱ्या वेबसाईट, सोशल नेटवर्कींग साईटवर लक्ष ठेवले जात असून, अशा वेबसाईट सर्व्हीस प्रोव्हाईडर कंपनीशी संपर्क साधण्यात येत असून धार्मिक असलोखा निर्माण करणाऱ्या इसमांविरुध्द कायदेशीर कार्यवाही करणे तसेच दहशतवादी संघटनांमध्ये ऑनलाईन भरती करीत असल्याचा संशय येत असलेल्या साईटवर लक्ष ठेवण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) बाभुळगाव खलसा येथील शेतकऱ्याने आत्महत्या केल्याबाबत**

**(२०) ६७७१० (१६-०१-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) बाभुळगाव खलसा येथील एका ४० वर्षीय शेतकऱ्याने त्यांच्या मुलीची छेड काढणाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून विषप्राशन करून आत्महत्या केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०१७)** :(१) सदर घटना ही रायगड जिल्ह्यात घडली नसून अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात असलेल्या बाभुळगाव खालसा या गावी घडलेली आहे.

(२) सदर प्रकरणी कर्जत पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. २२७/२०१६ भादवि कलम ३०६, ५०४, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणाच्या चौकशीत ५ आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी एका आरोपीस मा.न्यायालयाने तात्पुरता अटकपूर्व जामिन मंजूर केला आहे. उर्वरित ४ आरोपींना अटक करण्यात आली असून सध्या ४ ही अटक आरोपी मा.न्यायालयाच्या आदेशाने जामिनावर मुक्त आहेत. सदर प्रकरणाचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर रेल्वे स्थानकाच्या मुख्य प्रवेशव्दारावरील मेटल डिटेक्टर बंद असल्याबाबत**

**(२१) ६७७८७ (११-०१-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर रेल्वे स्थानकांच्या मुख्य प्रवेशाद्वारावरील मेटल डिटेक्टर बंद असल्याने कोल्हापूर रेल्वे सुरक्षा कमकुवत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर रेल्वे स्थानकाच्या सुरक्षेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१७) :**(१) कोल्हापूर रेल्वे स्थानकाच्या मुख्य प्रवेशव्दारावरील मेटल डिटेक्टर हा दि.२८.१०.२००८ रोजी बसविण्यात आलेला आहे. सदरचा मेटल डिटेक्टर सध्या चालू स्थितीत आहे. मेटल डिटेक्टर शेजारी रेल्वे सुरक्षा बलाचे जवान कार्यरत आहेत.

(२) भारतीय रेल्वे सुरक्षेसाठी केंद्र शासनाकडून स्वतंत्र "रेल्वे सुरक्षा बल" निर्माण केले आहे. कोल्हापूर येथील रेल्वे स्थानकावर सुरक्षेसाठी रेल्वे सुरक्षा बल कार्यरत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वरळी पोलीस मुख्यालयातील हेड कॉन्स्टेबलचा**
**मृतदेह ठाणे खाडीत आढळून आल्याबाबत**

**(२२) ६७९६१ (११-०१-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भालसी (ता.भातकुली, जि.अमरावती) येथील मुळची रहिवाशी असलेल्या माधुरी सोळंके, पोलीस हेड कॉन्स्टेबल, वरळी पोलीस मुख्यालय येथे कर्तव्यावर असताना अचानक बेपत्ता झाल्या व त्यानंतर त्यांच्या बहिणीने पोलीस ठाण्यात दिनांक २२ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास तक्रार दाखल केली असता पोलिस तपासात त्यांचा मृतदेह ठाणे समुद्राच्या खाडीत आढळून आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कारवाई व्हावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ ऑगस्ट, २०१६ रोजी मा.जिल्हा पोलीस अधिक्षक, अमरावती (ग्रामीण) यांना लेखी निवेदन दिले आहे तसेच आदिवासी हक्क परिषद, आदिवासी पारधी संघटनेतर्फे या प्रकरणी सी.आय.डी. चौकशीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०३-२०१७) :**(१) मयत महिला पोलीस शिपाई माधुरी सोळंके यांची बहिण रेशमा सोळंके यांनी दिनांक १५.८.२०१६ रोजी महिला पोलीस शिपाई माधुरी सोळंके हि बेपत्ता झाल्याबाबत तक्रार दिल्यावरुन वरळी पोलीस ठाणे येथे मिसिंग तक्रार क्र. ७५/१६ दाखल केली आहे. मयत महिला पो.शि. हिचा मृतदेह ठाणे रेल्वे पोलीस स्टेशन जवळील रेल्वे रुळावर मिळून आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी ठाणे रेल्वे पोलीस स्टेशन येथे चौकशी केली असता मिळत्या-जुळत्या वर्णनाची एका ३५ वर्षीय बेवारस महिला ही रेल्वेच्या धडकेने मृत्यू झाल्याबाबत मिळालेल्या माहिती वरुन तपासले असता सदरचा मृतदेह बेपत्ता माधुरी सोळंके हिचा असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर घटनेची नोंद ठाणे रेल्वे पोलीस स्टेशन येथे अपमृत्यू क्रमांक २१६/१६ अशी असून सदर मृत्यूचे कारण हे हेड इन्जुरी तसेच पोलिट्रोमा असे नमूद आहे. सदर अपमृत्यूचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, नवी मुंबई यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोपर्डी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील शाळेसाठी जाणारा रस्ता सुनसान असल्याने मुलींसाठी सुरक्षित नसल्याबाबत**

**(२३) ६७९६५ (१६-०१-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपर्डी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील अल्पवयीन मुलीवर अत्याचार व हत्याकांडामुळे गावात दहशतीचे वातावरण असून घटनेनंतर कोपर्डी व शिंदे गावातील सुमारे ३०० मुलींची शाळा बंद पडली आहे मुलींना ज्या रस्त्याने शाळेसाठी पाच कि.मी वरील कुळधरण येथे जावे लागते तो रस्ता मुलींसाठी सुरक्षित नाही मात्र पोलिस व जिल्हा प्रशासन याकडे गांभीर्याने पहात नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत अहे,

(३) तसेच, कोपर्डी येथे घडलेल्या घटनेतील आरोपींवर तातडीने कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) कोपर्डी येथे घडलेल्या घटनेबाबत कर्जत पोलीस स्टेशन जि.अहमदनगर येथे गुरनं. I १६७/२०१६ भादंवि कलम ३०२, ३७६(अ), ३७६(ड) बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा कलम ४ व ६ प्रमाणे दि.१४.७.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आले आहे. आरोपीविरुध्द दि.७.१०.२०१६ रोजी. मा.न्यायालयात

दोषारोपपत्र दाखल केले आहे. सदर खटल्यात विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून श्री.उज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली असून, दि.१८.१०.२०१६ पासून सदर खटल्याची सुनावणी सुरु झाली आहे. गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आवळगाव (ता.ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर) येथील अल्पवयीन मुलीवर बलत्कार करुन हत्या करण्यात आल्याबाबत**

**(२४) ६८१६४ (१७-०१-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आवळगाव (ता.ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर) येथील १७ वर्षाची अल्पवयीन मुलगी शेतावर गेली असता घरी परत आली नाही म्हणून गावकऱ्यांनी शोधाशोध केली असता तिच्यावर अज्ञात व्यक्तींनी बलात्कार करुन तिचा खुन केल्याचे दिनांक २४ ऑक्टोंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०१७) :**(१) होय.
(२) फिर्यादीची भाची मृतक मुलगी दि.२३.१०.२०१६ रोजी जेवणाचा डब्बा घेऊन एकटीच शेतावर गेली. ती घरी परत आली नसल्याचे तीचा शोध घेतला असा शेतातील गावतात तीचे प्रेत नग्न अवस्थेत मिळाले. तीचा गळा आवळून व दोन्ही हात बांधून असलेल्या अवस्थेत प्रेत मिळून आल्याने तिचेवर कोणीतरी अज्ञात इसमाने लैंगिक अत्याचार करुन खून केला असे दिलेल्या तोंडी रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन ब्रम्हपूरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द अपराध क्र.४९९/२०१६ कलम ३०२, ३७६(अ) भादंवि सह कलम ४ पोक्सो अन्वये दि. २४.१०.२०१६ रोजी गुन्हा नोंद करण्यात आले. तपासामध्ये गोपनीय माहिती काढून आरोपीस अटक करण्यात आले आहे. आरोपिविरुध्द दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**निमगाव केतकी (ता.इंदापूर, जि.पुणे) येथे चोरीच्या संशयातून मायलेकींना भर रस्त्यावर विवस्त्र करुन झडती घेण्यात आल्याबाबत**

**(२५) ६८३१६ (११-०१-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निमगाव केतकी (ता.इंदापूर, जि.पुणे) येथे चोरीच्या संशयातून दलित समाजातील मायलेकींना भर रस्त्यावर विवस्त्र करुन त्यांची झडती घेण्याचा प्रकार माहे फेब्रुवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
फिर्यादी व तिची मुलगी ह्या रिक्षाने जात असताना आरोपीने रिक्षा आडवली.जातीवाचक बोलून रस्त्याच्या कडेला असलेल्या दुकानाच्या गाळ्यामध्ये नेवून शटर लावून फिर्यादी व तिच्या मुलीचे कपडे काढून झडती घेतली आहे.
(२) सदर प्रकरणाबात इंदापूर पोलीस स्टेशन गुरनं. ८५/१६ भादवि कलम ३५४, ३४१, ३२३ एस.सी.ॲन्ड एस.टी.प्रिव्हेंशन ऑफ ॲट्रासिटी ॲक्ट कलम ३(१)(ई)(आर)(यु)(डब्ल्यु) प्रमाणे दि.२२.२.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आले आहे. गुन्ह्याचा तपास पुर्ण झाला असून, आरोपीविरुध्द दि. १९.४.२०१६ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उदगीर (जि.लातूर) शहरात जास्त पगाराचे अमिष दाखवून केलेला बलात्कार**

**(२६) ६८३३४ (१६-०१-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उदगीर (जि.लातूर) शहरात एका खाजगी रुग्णालयात टेक्निशियन म्हणून काम करणा-या तरुणीस जास्त पगाराची नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून दोन जणांनी बलात्कार केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :**(१) होय.
(२) सदरची घटना दि. २१.८.२०१६ रोजी घडली आहे. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन उदगीर ग्रामीण येथे गुरनं. ४५६/१६ कलम ३७६(२)(ई)(डी), ५०४, ५०६, २०१ भादवि सह कलम ६५ (अ) माहिती तंत्रज्ञान कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यातील दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. दोन्ही आरोपीविरुध्द दि.१०.११.२०१६ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई विक्रोळी (पूर्व) टागोर नगर येथील म्हाडाने बांधलेल्या २९६६ सदनिकांबाबत**

**(२७) ६८९२५ (१६-०१-२०१७). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विक्रोळी (पूर्व) टागोर नगर येथील म्हाडाने सन १९६०-६२ साली बांधलेल्या २९६६ निवासी सदनिकापैकी १२१ सदनिका तेथे राहत असलेल्या महापालिका कर्मचारी, केंद्र शासनाचे आस्थापनेवरील सी.बी.आय. पोलीस कर्मचारी यांच्या नावांवर सदर सदनिकांची मालकी जैसे थे स्थितीमध्ये करण्याचा १९८७ साली झालेला प्रशासकीय निर्णय आणि म्हाडाच्या दिनांक २१ ऑक्टोबर, १९९२ रोजी झालेला ठराव क्र. ३०९७ बाब क्रम. ११९/३ नुसार झालेला निर्णय प्रलंबित असल्याने सदरचा प्रलंबित असलेला प्रस्ताव मंजूर करुन पोलीस कर्मचारी, महापालिका कर्मचारी रहिवाशांना यांना न्याय देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी केली असल्याची बाब माहे जून, २०१६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत काही धोरणात्मक निर्णय घेतला आहे काय किंवा घेणार आहे काय, असल्यास त्याचा तपशिल काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२०-०३-२०१७) :**(१) व (२) हे खरे आहे. तथापि, टागोर नगर, विक्रोळी (पूर्व) येथील मूलत: भाडे तत्वावर असलेले गलिच्छ वस्ती निर्मुलन योजनेअंतर्गतचे २९६६ बैठे गाळे म्हाडा प्राधिकरणाने दि.२१.१०.१९९२ च्या ११९ व्या बैठकीमध्ये ठराव क्र. ३०७७ अन्वये "जसे आहे तसे" तत्वावर विक्री योजने अंतर्गत अधिकृत तसेच अनधिकृत गाळेधारकांना देण्याचा निर्णय घेण्यात आला. सदरहू गाळ्यांपैकी काही गाळे महानगरपालिका, शासन व सार्वजनिक संस्था यांना देखील वितरीत करण्यात आले आहे. तथापि या प्रकरणी विभागाची ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची अट असल्यामुळे ज्या विभागाने ना हरकत प्रमाणपत्र दिले त्या विभागाच्या कर्मचाऱ्यांना विक्री योजनेअंतर्गत सामावून घेण्यात आले. मात्र सहाय्यक पोलिस आयुक्त (मुख्यालय-३) पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी दि.०२.०३.२००२ च्या पत्राने पोलिस कर्मचाऱ्यांना वितरीत केलेले टागोर नगर येथील १२१ गाळे पोलिस कर्मचाऱ्यांच्या नावे करण्यासंबंधी हरकत घेतलेली आहे त्यामुळे सदरचे गाळे पोलिसांच्या नावे होऊ शकलेले नाही.

तद्‌नंतर म्हाडाने दि.०७.०१.२०१७ रोजी माहे मार्च २०१७ पर्यंतचे टागोर नगर व कन्नमवार नगर येथील एकूण २६४ गाळ्यांसाठी एकूण रक्कम रु.३,३९,२२,२६८/- च्या थकबाकीचा भरणा करण्याबाबत कळविले आहे. सद्य:स्थितीत पोलिस विभागाने थकबाकीचा भरणा केलेला नाही. सदरहू रक्कमेचा भरणा केल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे असे म्हाडा कार्यालयाने त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिंधी शिवार (ता.मारेगाव, जि.यवतमाळ) येथे महिलेला जबरदस्तीने दारु पाजुन ८ जणांनी बलात्कार केल्याबाबत**

**(२८) ६९०३९ (११-०१-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिंधी शिवार (ता.मारेगाव, जि.यवतमाळ) येथे २९ वर्षीय महिलेला जबरदस्तीने दारु पाजून ८ जणांनी अमानुष बलात्कार केल्याची तक्रार दिनांक १६ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास सदर महिलेच्या नातेवाईकांनी मारेगाव पोलीस ठाण्यात केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महिलेवर दारु पाजून अत्याचार करणा-या संबंधीत व्यक्तींविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०१७) :**(१) होय.

(२) प्रस्तुत प्रकरणी पिडीत महिलेने दिलेलया तक्रारीवरुन पोलीस स्टेशन मारेगाव येथे गु.र.क्र. २६७/१६ कलम ३७६(ड), ३४१, ३६३२ भादंवि सह कलम ३(१) (१२), ३ (२)(५) अनुसूचीत जाती जमाती अत्याचर प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आले आहे. गुन्ह्यातील ८ आरोपींना अटक करण्यात आले आहे. आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात १२ वर्षापेक्षा अधिक सेवाकाळ पूर्ण केलेल्या होमगार्डना पुनर्नियुक्ती विनाअट देण्याबाबत**

**(२९) ६९१५२ (११-०१-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मा.महासमादेशक होमगार्डच्या आदेशानुसार १२ वर्षापेक्षा अधिक सेवाकाळ पूर्ण केलेल्या होमगार्डना पुनर्नियुक्ती नाकारण्यात आलेली असून त्यांना विविध शारिरीक चाचण्यातून उत्तीर्ण झाल्यानंतरच पुनर्नियुक्ती देण्याबाबत शासनाने शासन निर्णय काढला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शासन निर्णय अन्यायकारक असून तो रद्द करुन १२ वर्षापेक्षा अधिक सेवाकाळ झालेल्या होमगार्डच्या पुनर्नियुक्तीसाठी प्रस्तावित शारिरीक चाचण्या कायमच्या रद्द करुन सर्वाना विनाअट पुनर्नियुक्ती देण्याबाबत तसेच सर्व होमगार्डसना नियमित सेवा प्रदान करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :**(१) व (२) शासन निर्णय गृह विभाग क्र. एचजीएस-०३१०/प्र.क्र.४९/विशा-८, दिनांक १३-०७-२०१० अन्वये होमगार्डचा संघटनेतील एकूण कर्तव्य कालावधी १२ वर्ष एवढा ठरविण्यात आला असून ३ व ६ वर्षानंतर पुनर्नोदणीची तरतूद ठेवण्यात आली आहे. तसेच मुंबई होमगार्ड नियम, १९५३ मधील नियम क्र.८ मधील तरतूदीनुसार होमगार्ड सदस्याचा पदावधी ३ वर्षाचा असल्याचे नमूद करण्यात आले असून नियुक्त केलेली व्यक्ती ही पुनर्नोदणीस पात्र असेल असे नमूद करण्यात आले आहे. तसेच नेमणूक केलेली व्यक्ती ही वैद्यकीय व शारीरिकदृष्या पात्र असणे आवश्यक आहे. यासंदर्भात महासमादेशकांचे कार्यलय यांचे पत्र क्र. मस/कार्या-३/२०१६/९४२, दि. १८.३.२०१६ अन्वये पुनर्नोदणी दरम्यान शारिरीक पात्रता आजमावण्यासाठीचे निर्गमित केलेले परिपत्रक महासमादेशकांचे कार्यालय यांनी दि. ८.६.२०१६ च्या पत्रान्वये रद्द करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील टिटवाळा जवळ कल्याणी येथे स्वस्तात घरे बांधून देण्याचे आमिष दाखवून ग्राहकांची फसवणूक केल्याबाबत**

**(३०) ६९२६० (११-०१-२०१७). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टिटवाळा (जि.ठाणे) जवळ कल्याणी येथे स्वस्तात घरे बांधून देण्याचे आमिष दाखवून इब्राहिम बच्चूमिय्या मुज्जवर ऊर्फ मामू यांने ग्राहकांकडे लाखो रुपये घेऊन त्याची फसवणूक करुन पळून गेल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०३-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) प्रस्तुत प्रकरण चौकशी मकरण्यात आली असून आरोपीने फिर्यादी व इतर ७ जणांना मौजे बनेली ता.कल्याण येथील जमीन सर्व्हे नं. ९७/३ मध्ये रुम बनवून देता असे सांगून त्यांच्याकडून एकूण १०,०६,०००/- रुपये घेऊन त्यांना रुम अथवा पैसे परत न करता त्यांची फसवणूक करुन सदर पैशचा अपहार केल्याबाबत आरोपीता विरुध्द कल्याण तालुका पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २७५/२०१६ भा.दं.वि. कलम ४२० व ४०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयातील आरोपीने मा.जिल्हा सत्र न्यायालय, कल्याण येथे अटकपूर्व जामीन करीता अर्ज सादर केलेला असून गुन्हयाचा तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धारावी (मुंबई) परिसरातील काळा किल्ला येथील म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील घरे विकण्यात आल्याबाबत

**(३१) ६९२८३ (११-०१-२०१७). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धारावी (मुंबई) परिसरातील काळा किल्ला येथील म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील घरे विकण्यात आल्याप्रकरणी धारावी पोलीसांनी तीन आरोपींना अटक केली असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी पूर्ण केली आहे काय, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०३-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी धारावी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १६५/२०१६ भा.दं.वि. कलम ४२०, ४६७, ४६८, ४८१, ५०४, ३४१, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या गुन्ह्यात ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण पूर्व परिसरात चेन स्नेचिंगच्या घटना वारंवार होत असल्याबाबत

**(३२) ६९६३२ (११-०१-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण पूर्व परिसरामध्ये चेन स्नेचिंगचे प्रकार वारंवार होत असल्यामुळे परिसरातील महिला, वृध्द नागरीक धास्तावले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकारांना आळा बसविण्यास पोलिस प्रशासन निष्प्रभ ठरले असल्याने परिसरातील नागरीकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

कोळसेवाडी पोलीस ठाण्यंत १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी फिर्यादी देवकी रमाकान्त गरीबे ह्या सार्वजनिक रोड वरुन पायी जात असताना फिर्यादीच्या गळयातील रु.३० हजार किमतीचे १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र जबरीने खेचून चोरुन नेत असतांना त्या झटापटीत फिर्यादीच्या उजव्या हाताच्या कोपरास मार लागला. प्रस्तुत प्रकरणी कोळसेवाडी पोलीस स्टेशन

येथे गु.र.क्र.३६६/१६ भा.दं.वि. ३९४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील अनोळखी आरोपीचा सर्वतोपरी शोध घेण्यात येत असून आरोपी अद्याप निष्पन्न झालेला नाही.

ठाणे पोलीस आयुक्त परिसरातील परिमंडळ-३ कल्याण पूर्व परिसरात सन २०१६ मध्ये एकूण १५ चैन स्नॅचिंगचे गुन्हे दाखल असून त्यापैकी ७ गुन्हे उघडकीस आले आहेत.

(३) सदर घटनेबाबत गुन्हा दाखल करण्यात आला असून परिसरात बीट मार्शल तसेच इतर पोलीस कर्मचारी यांची गस्त वाढविण्यात आली आहे. महिलांच्या सुरक्षेबाबत चैन स्नेचींगच्या घटना घडण्याची शक्यता असलेल्या ठिकाणावर फिक्स पॉईंट नेमण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाम्हणी (उमरेड, जि.नागपूर) येथे वडिलांनी स्वतःच्या मुलीचा नरबळी देण्याचा घडलेला प्रकार**

**(३३) ६९७७८ (१७-०१-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाम्हणी (उमरेड, जि.नागपूर) येथे स्वतःच्या मुलीचा नरबळी देण्याचा प्रकार मुलीच्या आईने अंनिसच्या कार्यकर्त्यांच्या मदतीने दिनाक २१ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या सुमारास निदर्शनास आणला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मुलीच्या आईने दोनदा स्थानिक पोलिस स्थानकांत तक्रार दाखल करुनही कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबधित दोषी वडिल व मांत्रिकांवर पोलिसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) हा प्रकार नरबळीचा नसुन नवऱ्याचे परस्त्री सोबत अनैतिक संबंध असल्यामुळे त्या स्त्रीला घरातून बाहेर काढण्यासाठी नरबळीबाबतची लेखी तक्रार दिली होती. परंतू नरबळीचा कोणताही प्रकार घडला नाही. त्यावरुन त्या अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नाही.

(३) अर्जदाराचे पतीचे दुसऱ्या परस्त्रीशी अनैतीक संबंध असल्याची शंका असल्याचे अर्जदाराने सांगितले नरबळी चा प्रकार नसल्याबाबत बयाण व लेखी अर्ज दिले. नमूद घटना तशा प्रकारची घडली नसल्याने कार्यवाही करण्यात आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई-विरार परिसरात महिलांच्या सुरक्षेसाठी महिला पोलिसांचे दामिनी पथक स्थापन करण्याबाबत**

**(३४) ६९८८३ (११-०१-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार परिसरातील महिलांच्या सुरक्षेकरिता महिला पोलिसांचे "दामिनी पथक" स्थापन करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पथक केव्हापासून अस्तित्वात येणार आहे व त्या पथकाला कोणत्या स्वरुपाचे विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे तसेच सदर पथक त्वरित कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०१७) :**(१) होय.
(२) वसई विरार परिसरातील महिलांच्या सुरक्षेकरिता महिला पोलीसांचे दामिनी पथक दि.२२.७.२०१६ पासून स्थापन करण्यात आलेले आहे. सदर पथकात नेमण्यात आलेल्या पोलीस कर्मचारी यांना शारिरीक तंदुरुस्तीचे प्रशिक्षण तसेच मोटार सायकल चालविण्याचे व शस्त्र हाताळण्याचे, चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वजिराबाद (जि.नांदेड) येथील पोलिसांनी ट्रकमध्ये मांस व हाडे विना परवानगी चोरट्या मार्गाने वाहतूक करणाऱ्यांना पकडल्याबाबत

**(३५) ७०२४९ (१७-०१-२०१७). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागू असतांनाही वजिराबाद (जि.नांदेड) येथील पोलिसांनी ट्रकमध्ये मांस व हाडे विना परवानगी चोरटया मार्गाने वाहतूक करणाऱ्यांना नुकतेच माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान पकडले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१७) :**(१) व (२) दिनांक १७.०४.२०१६ रोजी पोलीस स्टेशन, वजिराबाद, जि.नांदेड हद्दीत मुकेश कुमार रामपती व रविंद्रसिंह तहेलसिंह रा.मिलक, ता.जि.धौलपूर (राजस्थान) हे चालक असलेल्या ट्रक क्रमांक आरजे- ११ जीए-८५६२ या ट्रकमध्ये जनावरांची हाडे व इतर सुकलेले अवयव घेऊन जात असतांना आढळून आल्याने त्यांना अटक करण्यात आली. सदर प्रकरणी त्यांच्याविरुध्द गु.र.नं. ३१/२०१६ कलम ४२९, ३४ भा.दं.वि. सह कलम ५ (अ), १, २ (क), ५ (ड) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) येथे श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या कर्मचाऱ्यांनी आंदोलन केल्याबाबत**

**(३६) ७०४४१ (१०-०१-२०१७). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथे आषाढी एकादशी दरम्यान दिनांक २९ जून, २०१६ रोजी श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या कर्मचाऱ्यांनी आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंदोलनकर्त्या कर्मचाऱ्यांच्या मागण्या कोणत्या आहेत तसेच उक्त मागण्यापैकी कोणत्या मागण्या शासनाने मान्य केल्या आहेत व उर्वरित मागण्यांबाबत सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) आंदोलनकर्त्या कर्मचाऱ्यांच्या मागण्या पुढीलप्रमाणे आहेत :-

१. शासनाच्या स्थायी कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करणे.

२. अपर कामगार आयुक्त, पुणे यांचे पत्र क्र.१५९५ दि. २०.४.२०१५ ची अंमलबजावणी करणे.

३. मंदिर समितीच्या दि.२९.०४.२०१५ च्या बैठकीतील ठराव क्र.५ (१) व (२) ची पूर्तता करणे.

उपरोक्त मागण्यांच्या अनुषंगाने मंदिर समितीच्या कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंडनगड (जि. रत्नागिरी) येथील दुय्यम निबंधकास लाच स्विकारताना झालेली अटक**

**(३७) ७०४५२ (११-०१-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंडणगड (जि.रत्नागिरी) येथील दुय्यम निबंधक चंद्रकात तुकाराम आंबेकर व जमीन दलाल नितीन मोरे यांना दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या अधिकाऱ्याने जमीन खरेदी खताच्या दस्तांची नोंदणी करण्यासाठी २० हजार रुपयांची लाच स्विकारताना अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) या प्रकरणी आरोपी लोकसेवक चंद्रकांत तुकाराम आंबेकर, दुय्यम निबंधक, मंडणगड जि.रत्नागिरी (वर्ग-३) यांचेविरुध्द मंडणगड पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत

प्रतिबंधक अधिनियम, १९८८ च्या कलम ७, ८, १३ (१) (ड) सह १३(२), प्रमाणे दि.२०/१०/२०१६ रोजी गु.र.क्र.५२/२०१६ दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे. तसेच आरोपी लोकसेवक श्री.आंबेकर यांना अटकेच्या दिनांकापासून निलंबित करण्यात आले आहे.

---

**नांदेड जिल्हयातील महिला व अल्पवयीन मुलीवर अत्याचाराच्या घटनेच्या प्रमाणात वाढ होत असल्याबाबत**

**(३८) ७०६२५ (१७-०१-२०१७). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील महिला व अल्पवयीन मुलीवर अत्याचाराच्या घटनेच्या प्रमाणात वाढ झाली असून सन २०१३ ते २०१५ या तीन वर्षात १२६ अल्पवयीन मुलीवर व १ हजार ११ महिलांवर अत्याचारांच्या घटनांची नोंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील गुन्हेगारीचे वाढते प्रमाण रोखण्याकरिता पोलिस प्रशासन अपयशी ठरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयातील गुन्हेगारीचे प्रमाण रोखण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०१७) :**(१) नांदेड जिल्ह्यात महिला व अल्पवयीन मुलीवर सन २०१३ मध्ये १९९ गुन्हे, सन २०१४ मध्ये १९० गुन्हे व सन २०१५ मध्ये २३५ गुन्हे बलात्कार व विनयभंग या सदराखली दाखल झालेली असून, फक्त अल्पवयीन मुलीवरील बलात्कार व विनयभंगाचे सन २०१३ ते २०१५ या तीन वर्षात १७० गुन्हे दाखल आहेत.

(२) हे खरे नाही.

जिल्ह्यातील महिला व अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराची गुन्ह्याचा तपास प्राधान्याने पूर्ण करण्यात आले आहे.

(३) नांदेड शहरात दोन दामिनी पथक स्थापन करुन पथकामार्फत शाळा, कॉलेज, खाजगी टिवशन, बाजाराचे ठिकाण येथे भेट देवून महिला व मुलींचे छेडछाड होणार नाही या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे. महिला गस्ती पथकामार्फत सन २०१६ मध्ये कलम ११०/११७ महाराष्ट्र पोलीस अधिनियम प्रमाणे १४३२ खटले व मोटार वाहन अधिनियमाप्रमाणे २८४६ खटले दाखल करण्यात आले आहे, महिला सहाय्य कक्ष, महिला दक्षता समिती ची स्थापना करण्यात आली आहे. महिला सहाय्य कक्ष व महिला दक्षता समितीकडून मुलींच्या निवासी आश्रम शाळेस भेटी देऊन मुलीव महिलांवरील अत्याचार संबंधाने हेल्पलाईन व पोलीस स्टेशनचे दुरध्वनी क्रमांक इत्यादी बाबतची माहिती देण्यात आली आहे. मुली व महिलांविरुध्दचे गुन्हेगारी रोखण्याकरिता सातत्याने प्रभावीपणे प्रयत्न करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाण्यातील दोन इसमांनी बेरोजगार तरुणांना आखाती देशांत नोकरीसाठी पाठवण्याचे आमिष दाखवत फसवणूक केल्याबाबत

**(३९) ७०७०६ (१६-०१-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्यातील दोन इसमांनी उत्तर प्रदेशातील बेरोजगार तरुणांना आखाती देशांत नोकरीसाठी पाठवण्याचे आमिष दाखवत त्यांची कोट्यावधी रुपयांची फसवणूक केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोघा आरोपींना ठाणे गुन्हे शाखेने अटक केली असून त्यांच्याकडून सुमारे १४२ पासपोर्ट आणि शेकडो बनावट व्हिसा जप्त करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधीत गुन्हेगारांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे तसेच तरुणांचे पैसे परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०३-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

परंतु आतापर्यंतचे तपासात एकूण ८ लाख ७० हजार रुपये रकमेचा अपहार केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

नमूद गुन्ह्यात २ आरोपींना अटक केली असून त्यांच्या ताब्यातून एकूण १७८ पासपोर्ट, एकूण ५३ बनावट व्हिसा, एकूण १३ जेट एअरवेज विमानाची बनावट टिकिटे असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(३) सदर प्रकरणी राबोडी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २५४/२०१६ भा.दं.वि. कलम ४६७, ४६८, ४७१, ४२०, ४०९, ३४ अन्वये २ आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सध्या दोनही आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावली (जि.चंद्रपूर) येथे दिवाणी व फौजदारी न्यायालय इमारतीचे बांधकाम करण्याच्या प्रस्तावास मंजूरी मिळण्याबाबत

**(४०) ७१०४१ (१०-०१-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावली (जि.चंद्रपूर) येथे दिवाणी व फौजदारी न्यायालय इमारतीचे बांधकाम करण्याकरीता अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चंद्रपूर यांनी अंदाजपत्रकासह प्रस्ताव तयार करुन प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे अंतिम मंजूरीकरीता पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावरील संपुर्ण त्रुटी दुर केल्यानंतरही सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी मिळण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०२-२०१७) :**(१) होय.
(२) व (३) नाही. तथापि, सावली जि.चंद्रपूर येथे न्यायालयीन इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून सदर प्रस्तावास विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी (जि.ठाणे) येथील रामेश्वर मंदिराचे प्रवेशद्वार अंगावर कोसळून चार वर्षाच्या मुलीचा झालेला मृत्यू

**(४१) ७१४६४ (११-०१-२०१७). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील रामेश्वर मंदिराचे प्रवेशद्वार अंगावर कोसळून चार वर्षाची मुलगी मृत झाल्याची घटना दिनांक ३० ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास घडली, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार मृत मुलींच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०३-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) भिवंडी शहर पोलीस ठाणे अंतर्गत सदर घटना घडलेली असून मयत मुलगी ही मंदिराच्या गेट समोर खेळत असतांना मंदिराचे लोखंडी गेट तिच्या अंगावर पडून तिच्या डोक्यास गंभीर दुखापत झाल्यामुळे तिचा मृत्यू झाला. याबाबत भिवंडी शहर पोलीस स्टेशन येथे अकस्मात मृत्यु नोंद क्र. १०५/१६ सीआरपीसी कलम १७४ प्रमाणे प्रकरणाची दाखल करण्यात आली आहे.
प्रस्तुत प्रकरणांचा तपास सुरु असून घटनेबाबत मुलीचे कुटुंबियांनी कोणत्याही प्रकारची तक्रार केलेली नाही. तथापि, मंदिर समितीकडून दोन लाख रुपये मदत जाहिर करण्यात आली आहे. त्यापैकी एक लाख रुपये देण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण येथील तरूणीच्या हत्याकांडातील आरोपी भिवंडी बाल सुधार गृहामधून पळून गेल्याबाबत

**(४२) ७१४७३ (११-०१-२०१७). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी बाल सुधार गृहामधून कल्याण येथील तरूणीच्या हत्याकांडातील क्रुर आरोपी सिमेंट पत्रा फोडून इतर दोन आरोपींसह दिनांक ९ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या दरम्यान पळून गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गंभीर प्रकरणी शासनस्तरावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०३-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ-२ भिवंडी अंतर्गत शांतीनगर पोलीस ठाणे हददीत भिवंडी बालसुधारगृह आहे. दिनांक ३.१०.२०१६ रोजी रात्रीच्या सुमारास भिवंडी बाल सुधारगृहाचे छताचे सिमेंटचा पत्रा फोडून उड्या मारुन सुधारगृहात दाखल असलेला हत्याकांडातील बालअपचारी प्रविण वाघे व इतर गुन्ह्यांतील ईस्माईल रईस शेख, सुरज ऊर्फ कल्लू मोहन सिंग असे बालअपचारी पळून गेले होते.

(२) दिनांक ४.१०.२०१६ रोजी भिवंडी बालसुधारगृहाचे काळजीवहक यांनी दिलेल्या तक्रारीवरुन शांतीनगर पोलीस ठाणे येथे मानव मिसींग रजि.क्र.०५/२०१६ अन्वये दाखल करण्यात आली आहे.

सदर बाल अपचारी यांचा तत्काळ स्थानिक व संबंधित पोलीस ठाणे यांनी सर्वोतोपरी शोध घेऊन पळून गेलेले बालअपचारी मिळून आलेले आहेत. सदर तिन्ही बालअपचारी यांना पुन्हा बालसुधारगृह भिवंडी येथे दाखल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाण्यात तरूणाने साडेचार वर्षाच्या मुलीवर अत्याचार केल्याबाबत

**(४३) ७१४८० (११-०१-२०१७). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथे २४ वर्षीय तरूणाने साडेचार वर्षाच्या मुलीवर अत्याचार केला असुन सदर व्यक्ती राजकीय पक्षाचा स्थानिक पदाधिकारी असून उक्त घटनेनंतर प्रक्षुब्ध जमावाने सदर व्यक्तीस मारहाण करून संतप्तपणे निषेध केल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच वारंवार होणाऱ्या अत्याचारांच्या घटनांना आळा घालण्याबाबत शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आले आहे. गुन्ह्यातील आरोपी कोणत्याही राजकीय पक्षाचा स्थानिक पदाधिकारी नसून त्यास कोणत्याही प्रक्षुब्ध जमावाने मारहाण केली नाही
(२) श्रीनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. I २१०/१६ भा.द.वि. कल ३७६, ३७६(२) (आय) (जे) सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनीयम २०१२ चे कलम ३, ४, ५ (एम) व ६, ७, ८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात आले आहे. आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(३) ठाणे पोलीस आयुक्त परिसरातील श्रीनगर पोलीस ठाणे हद्दीमध्ये सोसायटीत शांतात कमीटी तसेच विविध महिला संघटना, एन.जी.ओ. पोलीस मित्र यांचे सहकार्याने जनजागृती मोहीम राबविण्यात येतात. महिलांना तात्काळ मदत मिळण्यासाठी हेल्पलाईन नंबर १०३ सुरु करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूर मिहान प्रकल्पांतर्गत विमान निर्माण उद्योगांमध्ये एअरोस्पेस इंडस्ट्री हब होणार असल्याबाबत

**(४४) ७१५९० (१०-०१-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर मिहान प्रकल्पांतर्गत विमान निर्माण उद्योगांमध्ये एअरोस्पेस इंडस्ट्री हब होणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ च्या चौथ्या आठवडयात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मिहान मधील टाटा उद्योग समुहाच्या ताल मॅन्युफॅक्चरिंग सोल्युशनतर्फे ड्रीमलायनर ७८७-८ आणि १० बोईंग विमानांसाठी निर्माण केलेल्या पाच हजाराच्या फ्लोअर बीमच्या पुरवठया संदर्भात कन्साईनमेंन्टचा शुभारंभ झाल्याने हजारो बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त एअरोस्पेस इंडस्ट्री हब पूर्ण क्षमतेने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच त्यानुषंगाने शासनाचे सर्वसाधारण धोरण काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०३-२०१७)** :(१) होय.

(२) होय.

(३) एरोस्पेस इंडस्ट्री हब करिता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने मे.ताल सह मे.इन्डमार एम.आर.ओ. आणि मे.रिलायन्स एरोस्ट्रक्चर लि. यां कंपन्यांना अनुक्रमे २९.३० व १०४ एकर जमीन लीजवर दिलेली असून मे.एअरवर्क्स आणि मे.सॅफरॉन सारख्या एरोस्पेस इंडस्ट्रीतील कंपन्यांनाही जमीन लीजवर देण्याबाबतची बाब विचाराधीन आहे. एअर इंडियाच्या एम.आर.ओ. मध्ये एअर इंडिया व एअरबस कंपनीची विमाने नियमितपणे दुरुस्ती साठी येत असल्यामुळे एरोस्पेस इंडस्ट्री हब पूर्ण खेमतेने सुरु होईल. महाराष्ट्र विमानतळ विकास कपनीच्या लॅन्ड डिसपोजेबल पॉलीसी, २०१६ मिहान मधील एव्हीएशन सेक्टर मध्ये गुंतवणूक करण्यास इच्छूक असलेल्या उद्योजकास जमीनीच्या किंमतीमध्ये ३३% सूट देणे व मूल्यवर्धित कर (VAT) माफ करणे या बाबी विचारधीन आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील देवीपाडा हायवे लगत असणाऱ्या गर्दुल्ले, चर्सी व चोरांपासून सामान्य नागरिकांचे संरक्षण करण्याबाबत

**(४५) ७१६२७ (११-०१-२०१७). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील देवीपाडा हायवे लगत असणाऱ्या गर्दुल्ले, चर्सी व चोरांपासून देवीपाड्यातील सामान्य नागरिकांना होणाऱ्या त्रासातून सुटका मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २० सप्टेंबर, २०१६ रोजीच्या सुमारास वरिष्ठ पोलिस निरिक्षक, कस्तुरबा पोलिस ठाणे, बोरिवली यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीनुसार पोलिस प्रशासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०३-२०१७)** :(१) होय. हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी कस्तुबा मार्ग पोलीस ठाणे अंतर्गत एटीसी पथकामार्फत सन २०१६ ते २०१७ आज पावेतो देवीपाडा परिसरातील गर्दुल्ले व नशा करतांना आढळून आलेल्या इसमांविरुध्द एनडीपीएस कलमान्वये एकूण १७ इसमांवर कारवाई करण्यात आली आहे.

सन २०१६ मध्ये पोलीस ठाणे हद्दीत गर्दुल्ले व नशा करतांना आढळून आलेल्या इसमाविरुध्द एनडीपीएस कलमान्वये एकूण २३० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून मा.न्यायलयाने आरोपींना सजा सुनावली आहे.

नमूद परिसरात गर्दुल्ले नशेबाज यांचेपासून स्थानिक रहिवाशांना त्रास होता कामा नये याकरीता अडगळीच्या ठिकाणी/मोकळ्या जागा, मैदान, उद्यान परिसर येथे अहोरात्र पहारे ठेऊन व गस्ती वाहनांच्या फेऱ्यांचे नियमन करण्यात आलेले आहे. सदर कारवाई व उपाययोजना सतत चालु ठेवण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक विभागाच्या माहिती आयोगाच्या ९ हजारांपेक्षा जास्त याचिका सुनावणीच्या प्रतिक्षेत असल्याबाबत**

**(४६) ७१९७६ (१०-०१-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक विभागाच्या माहिती आयोगात माहे डिसेंबर, २०१४ पासून आतापर्यंत ९ हजारांपेक्षा जास्त याचिका सुनावणीच्या प्रतिक्षेत प्रलंबित आहेत तसेच नव्याने दाखल होणाऱ्या अपिलांची संख्या देखील वाढत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य माहिती आयोगाच्या नाशिक विभागाला पूर्ण वेळ आयुक्तांची नेमणूक नसल्यामुळे याचिका प्रलंबित राहण्याचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने पूर्ण वेळ आयुक्तांची नेमणूक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०१७) :**(१) होय.
(२) होय.
(३) व (४) शासनाच्या दि.६.१.२०१७ च्या अधिसूचनेद्वारे सर्वश्री. के.एल.बिष्णोई, संभाजी सरकुंडे व दिलीप धारुरकर या तीन राज्य माहिती आयुक्तांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. त्यापैकी सर्वश्री. के.एल.बिष्णोई, यांची नियुक्ती नाशिक येथे राज्या माहिती आयुक्त पदावर करण्यात आली असून त्यांनी सदर पदाचा कार्यभार स्वीकारलेला आहे.

---

**भिवंडी (जि.ठाणे) येथील कु.शम्मा अयुब मुल्ला या मुलीचे अपहरण झाल्याबाबत**

**(४७) ७२१७८ (११-०१-२०१७). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील कोंबडपाडा येथे राहणारी १४ वर्षीय कु.शम्मा अयुब मुल्ला या मुलीचे अपहरण झाल्याप्रकरणी माहे जुलै, २०१६ मध्ये निजामपुर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०३-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी निजामपूर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १०७/१६ भा.दं.वि. कलम ३६३ अन्वये गुन्हा दाखल केलेला होता. याबाबत चौकशी केली असता कु.शम्मा अयुब मुल्ला हिने, “मी स्वत:हून मुंबईला फिरण्यासाठी गेले होते, मला कोणीही पळवून नेलेले नव्हते व मी स्वत:हून घरी आलेली आहे.” असे सविस्तर प्रश्नोत्तरे स्वरुपात तिच्या आईच्या समक्ष जबाब नोंदविण्यात आलेला आहे.

एकदरीत झालेल्या तपासा वरुन फिर्यादी यांनी गैरसमजुतीने फिर्याद दिली असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने गुन्हयाची क वर्ग समरी मंजूर होण्यासाठी पाठविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**"श्रीमद् भगवतगीता" व "श्रीमद् लीळाचरित्र" या धर्मग्रंथातील "सिंद्धात सूत्रे" महिला वस्त्रावर छापण्यात आल्याबाबत**

**(४८) ७२६८३ (१६-०१-२०१७). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंदू धर्माचा पवित्र धर्मग्रंथ "श्रीमद् भगवतगीता" व महानुभाव संप्रदायाचा तथा मराठी भाषेचा आद्य ग्रंथ "श्रीमद् लीळाचरित्र" या धर्मग्रंथातील "सिंद्धात सूत्रे" महिला वस्त्रावर छापून (प्रिंट) विक्री करणा-या बिग बाजार (नागपूर, नाशिक) येथील वस्त्रविक्रेता, उत्पादक व डिझाईनर या सर्व संबंधितावर कायदेशीर कारवाई करून गुन्हेगारांना शिक्षा होणेबाबत माहे जुलै, २०१६ वा त्या दरम्यान महानुभाव पंथीयांच्या वतीने शासनाकडे लेखी निवेदन देवून मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) याबाबत यांनी दिनांक ११.०७.२०१६ रोजी प्राप्त झालेल्या तक्रार अर्जावरुन पोलीस स्टेशन सीताबर्डी, नागपूर शहर येथे अपराध क्रमांक ३१८/२०१६ कलम २९५ (अ),५०२ भा.दं.वि. अन्वये संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हयाचा तपास चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील रुग्णांना आर्थिक मदत करणाऱ्या श्री. साईबाबा विश्वस्त संस्थान तथा तत्सम विश्वस्त संस्थानाबाबत**

**(४९) ७३१३८ (१०-०१-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री. साईबाबा विश्वस्त संस्थान तथा तत्सम संस्थान व यासारखे संस्थान जे रुग्णांना आर्थिक मदत करित असून त्यावर असलेल्या जाचक अटी रद्द करणेबाबत मा. मुख्यमंत्री यांना माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यासुमारास दिले आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जाचक अटी रद्द करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१७) :**(१) श्री साईबाबबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमांमध्ये बदल करण्याबाबत पूर्नजिवन सामाजिक संस्था, ठाणे या संस्थेकडून मा.मुख्यमंत्री यांना माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये निवेदन देण्यात आले आहे.
(२) याबबात तपासून कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील धर्मादाय रुग्णालयात गरीब रुग्णांसाठी राखीव असलेल्या १०% योजनेची उत्पन्नाची मर्यादा वाढविणेबाबत

**(५०) ७३१४० (१०-०१-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील धर्मादाय रुग्णालयात गरीब रुग्णांसाठी राखीव असलेल्या १०% खाटा योजनेबाबत असलेली कमी उत्पन्नाची मर्यादा ५० हजार रुपये वरून १ लक्ष रुपये करणेबाबत लोकप्रतिनिधी तथा पुणे अंमलबजावणी कमिटीचे सदस्य यांनी पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.